# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणून मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम उत्साहाने संपन्न**

दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका "मराठी भाषा गौरव" दिनानिमित्त महानगरपालिकामार्फत विशेष कार्यक्रम मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, महानगरपालिका विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, महानगरपालिका शालेय मुख्याध्यापक, शिक्षक/शिक्षिका व विद्यार्थी या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवात महानगरपालिका मुख्य कार्यालय येथून नगरभवन पर्यंत शालेय विद्यार्थ्यांच्या ग्रंथदिंडीने व लेझिमच्या तालावर करण्यात आली. नगरभवन येथे ग्रंथालय प्रदर्शनात इतिहास, विज्ञान, व्यक्तिमत्व विकास इत्यादी मराठी भाषिक पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. तद्नंतर कविवर्य कुसुमाग्रज व सरस्वती माता यांच्या प्रतिमेला मा. आयुक्त यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त संजय शिंदे यांनी केले. प्रास्ताविकेनंतर महापालिका शाळेतील शिक्षकांनी महाराष्ट्र राज्यगीत गाऊन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून मराठी भाषा गौरव दिवस साजरा केला. काळानुरूप इंग्रजी भाषा ही जरी महत्त्वाची असली तरी मराठी भाषा ही प्राथमिक ठेवणे, मराठी भाषेचे महत्त्व, मराठी भाषा जोपासणे त्याचे संवर्धन करणेबाबत मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरातील नागरिकांना आपले मनोगत व्यक्त करताना आवाहन करत मराठी राज्यभाषा गौरव दिनानिमित्त सर्व शहरवासियांना शुभेच्छा दिल्या.